देशोन्नती

## फेरफटका

# विद्यार्थ्यांसाठी सायबर क्राइमबाबत मार्गदर्शन शिबिर

### खंडेलवाल विद्यालयातील मुलींनी केले मार्गदर्शन

देशोन्नती वृत्तसंकलन



**पारस :** वाढती गुन्हेगारी लक्षात घेता व वाढता सोशल मीडियाचा वापर लक्षात घेता आपण ऑनलाइन फसवणुकीला बळी पडत आहोत. तसेच आपण सोशल मीडियावर आपले जे वैयक्तिक फोटो माहिती शेअर करतो तिचासुद्धा गैरवापर होताना दिसत आहे. त्यासोबतच ऑनलाइन फ्रॉड कॉल, बँकेमधून ऑटोमॅटिक गायब होणारी रक्कम कशाप्रकारे फ्रॉड करून काढल्या जाते. तसेच विद्यार्थी लहान वयापासून मोबाइलमुळे वेडी झालेली आहेत. एक प्रकारचं महाभयंकर लागलेले मोबाइलचे व्यसन सोडवण्यासाठी शुक्रवारी शाळेमध्ये सायबर क्राइमबाबत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. मार्गदर्शन करण्यासाठी खंडेलवाल विद्यालय अकोला येथील प्रणाली पिंपळकर व शितल साखरे यांनी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक मनोज लांडे, सहाय्यक शिक्षक नीलेश सातव, शिवाजी पंडितकर, सय्यद असलम, राजेश दिवनाले, टिळक भारंबे, हेमंत उपरीकर, वर्षा होनाळे, सुहासिनी उबाळे, तृप्ती घाटोळ, रेशमा चांभारे, प्रिया लांडे, वैष्णवी लांडे, दीपाली दळी, सूचिता वानखडे, कल्याणी बकाल, रोशनी टेकाडे, जयमाला बोडखे, सोनाली भाकरे, रेखानाही नैताम, प्रियंका हागे, कोमल तायडे, रेखा भरणे, पूजा कराळे, शुभांगी लोड, फरहीन बानू, वैष्णवी टेकाडे, प्राची राऊत तर शालेय कर्मचारी करुणा खंडारे, शोभा साठे, श्रीराम साठे उपस्थित होते. संचालन रेखा भरणे तर आभार प्राची राऊत यांनी मानले.

Akola Edition Edition
Aug 10, 2024 Page No. 7
Powered by: